# लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळ

## विषय : मराठी साहित्य (ऐच्छिक)

## वर्ग : बी.ए. सहावे सत्र

## घटक – २

# "ज्ञानदेवे रचिला पाया"

सादरकर्ता: प्रा. जी. एम. भूजाडे
(मराठी विभाग)

# ज्ञानदेवे रचिला पाया

 

ज्ञानदेवांना जन्म शके ११९७ मध्ये झाला तर त्यांनी संजीवनी समाधी शके १२१८ मध्ये घेतली. अवघ्या वयाच्या एकविसाव्या वर्षी अल्प आयुष्यात साहित्यविषयक, सांस्कृतिक, आध्यात्मिक कार्य केले. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचा वापर आपल्या ग्रंथ निर्मितीसाठी केला तथा मराठी ही भाषा संस्कृत पेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे आवर्जून सांगितले.

# ज्ञानेश्वरी उर्फ भावार्थदीपिका

गीतेच्या अठरा अध्यायातील सातवे श्लोकांवर मुलक्रम न बदलता ध्यानेश्वरांनी नऊ हजार (९०००) ओव्यांचे परमसुंदर रसाळ काव्य शके १२१२ मध्ये लिहिले ज्ञानेश्वरीचे रचनाकार ज्ञानेश्वर असेल तर लेखनीक हे सच्चीदानंद बाबा आहेत. अशी कबुली ज्ञानेश्वर देतात

# अ) ज्ञानेश्वरी तत्वज्ञान

“ब्रम्ह सत्य, जगत मिथ्या” असे शंकराचार्यांचे तत्वज्ञान आहे. जग हे केवळ भासरूप आहे. शंकराचार्यांचे हे तत्वज्ञान ज्ञानेश्वरांना मान्य नाही. ज्ञानेश्वर म्हणतात की, “जगत मिथ्या नसून तेही परमात्मस्वरुपच आहे” सर्वत्र एकच आत्मतत्व भरून राहिले आहे त्यापेक्षा दुसरे काही नाही. आत्मा सर्वत्र भरलेला आहे.

# ब) ज्ञानेश्वरी काव्य

भक्त, ज्ञानी व योगी यांचे वर्णने करतांना सर्वज्ञ वृत्तीने संपन्न असणाऱ्या ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वाला काव्याचे पाझर फुटतात. मनाची कोमलता, हळुवारपण, प्रेमोत्कटता, धीरोदात्तता या त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अंगभूत असलेल्या गुणांनपोटी हे काव्य स्फुरू लागले **ज्ञानेश्वराचा** उल्लेख करताना “तत्वज्ञ कवी” असाच करावा लागतो. ज्ञानेश्वरी हे काव्य “तत्वज्ञान” आणि “काव्य” या दोन भरजरी धाग्यांनी विणले आहे. मराठीचा अभिमान व्यक्त करतांना ते म्हणतात,

“माझ्या मराठाची बोलू कौतीके

| परि अमृतातेही पैज जिंके |

## २) अमृतानुभव :

ज्ञानेश्वराच्या स्वतंत्र प्रतिभेचा विलास म्हणजे अमृतानुभव ग्रंथ होय. शके १२१४ मध्ये या ग्रंथाची रचना झाली पाच संस्कृत श्लोक व ८०४ ओव्या असलेला हा ग्रंथ एकूण १० प्रकरणात विभागला आहे.

# ३) चांगदेवपासष्टी :

या ग्रंथाची रचना आळंदीस शके. १२१६ च्या सुमारास झाली. ज्ञानदेवाची कीर्ती ऐकून चांगदेवांनी त्यांना पत्र पाठवले. अनुभवाने मोठ्या पण वयाने लहान असणाऱ्या ज्ञानदेवांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद अशा संभ्रमात पडल्याने शेवटी चांगदेवाने कोरेच पत्र ज्ञानेश्वरांना पाठविले या पत्राला पासष्टी ओव्यांचे पत्रात्मक उत्तर म्हणजे चांगदेव पासष्टी होय.

# ४) अभंगवाणी :

कीर्तन प्रवचनांची गरज म्हणून ज्ञानदेवांनी अभंगाची रचना केली. अभंगाची संख्या साधारण ७६५ एवढी आहे. यात हरीपानाचे अभंग, बालक्रिडेचे अभंग आहेत. अशाप्रकारे ज्ञानेश्वारांची वांङ्:मयीन कामगिरी विविध स्वरुपाची आहे.